CMYK

सुविचार

जिथे प्रयत्नांची उंची मोठी असते, तिथे नशिबालाही झुकावंच लागतं.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com




कोल्हापूर | सांगली | सातारा | सोलापूर | धाराशिव | लातूर | वर्ष 3 रे | अंक 77 | बुधवार, 10 जून 2026 | पाने 04 | किंमत रू.4 | epaper.arambhmarathi.com

# शक्तिपीठ महामार्गाबाबत प्रशासनाकडे कुठलीच माहिती नसल्याने संभ्रम वाढला

## इतर जिल्ह्यात मोजणी सुरू, धाराशिव जिल्ह्यात मात्र शांतता

## जुना मार्ग बदलल्याच्या चर्चा; सोशल मीडियावर गुगल नकाशा व्हायरल

आरंभ मराठी । धाराशिव

**नागपूर-गोवा या बहुचर्चित शक्तिपीठ महामार्गाबाबत धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. असे असतानाच, या महामार्गाबाबत जिल्हा प्रशासनाकडे कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे बाधित शेतकरी संभ्रमात पडले असून, महामार्गासंबंधी कुठलीच माहिती समोर येत नसल्यामुळे संभ्रम निर्माण झाला आहे. एप्रिल महिन्यात शक्तिपीठ महामार्गाचे संरेखन बदलल्याच्या बातम्या आणि महामार्गाचा संभाव्य नकाशा समोर आल्यानंतर याबद्दल चर्चा सुरू झाल्या होत्या. मात्र जिल्हा प्रशासनाकडे शक्तिपीठ महामार्गाबाबत कुठलीही माहिती उपलब्ध नसल्याचे समोर आल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. इतर जिल्ह्यात शक्तिपीठ महामार्गाची मोजणी सुरू झाली असून धाराशिव जिल्ह्यात मात्र मागील तीन महिन्यात यासंदर्भात कुठलीच हालहाल झालेली नाही.**




२८ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्य सरकारने नागपूर ते गोवा या नवीन द्रुतगती शक्तिपीठ महामार्गाची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात केली होती. त्यानुसार धाराशिवसह १२ जिल्ह्यातून ८०० किलोमीटरचा शक्तिपीठ महामार्ग नव्याने सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानंतर धाराशिवसह बाराही जिल्ह्यात या महामार्गाला शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवला. धाराशिव जिल्ह्यात याविरोधात आंदोलन सुरू करण्यात आले. २०२५ मध्ये या महामार्गासाठी प्रशासनाने प्रत्यक्ष मोजणी सुरू केली. धाराशिव जिल्ह्यातील १७ गावांमधून हा महामार्ग प्रस्तावित आहे. संयुक्त मोजणीला बाधित शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला. प्रसंगी पोलिस संरक्षण घेऊन महामार्गाची संयुक्त मोजणी करण्याचे प्रयत्न केले गेले. १७ पैकी आठ ते नऊ गावात मोजणी केल्यानंतर राज्य सरकारने अचानक या महामार्गाच्या संरेखनात बदल करण्यात येत असल्याचे जाहीर केले. त्यानुसार या महामार्गात सातारा जिल्ह्याचा समावेश करून महामार्ग ८५६ किलोमीटर लांबीचा करण्यात आला. धाराशिव जिल्ह्यापासून पुढे कोल्हापूर जिल्ह्यापर्यंत अगोदरचा मार्ग बदलून नवीन मार्गाचे आरेखन नव्याने केल्याचे राज्य सरकारने जाहीर केले. त्यानंतर समाजमाध्यमावर महामार्गाचा नवीन गुगल नकाशा व्हायरल झाला. त्यानुसार धाराशिव जिल्ह्यात हा महामार्ग नवीन क्षेत्रातून जात असल्याचे दिसत आहे. परंतु, यासंदर्भात जिल्हा प्रशासनाकडे कुठलीही माहिती उपलब्ध नसल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले.

### ६०५ गटातून ४६ किलोमीटर जाणार शक्तिपीठ महामार्ग

धाराशिव जिल्ह्यातील १७ गावातील ६०५ गटातून शक्तिपीठ महामार्ग जाणार आहे. अगोदर १९ गावे बाधित होणार होती. मात्र तुळजापूर तालुक्यातील दोन गावे वगळली असल्याने सध्या फक्त धाराशिव तालुक्यातील १७ गावांमधून महामार्ग जाणार आहे. नवीन आरेखनात धाराशिव जिल्ह्यातील लांबीमध्ये फरक पडला नसला तरी सुरुवातीच्या मार्गापासून नवीन मार्ग दोन ते तीन किलोमीटर दक्षिणेकडे सरकल्याचे दिसत आहे. मात्र प्रशासनाने यासंदर्भात अधिकृतपणे काहीच सांगितलेले नाही.

### बाधित होणाऱ्या नवीन शेतकऱ्यांची चिंता वाढली

महामार्गाचा नवीन गुगल नकाशा एप्रिल महिन्यात व्हायरल झाल्यानंतर मूळ महामार्गात दोन ते तीन किलोमीटर बदल झाल्याचे दिसत आहे. त्यातच एप्रिल महिन्यात राज्य सरकारने बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांचे गट नंबर प्रसिद्ध केले. त्यामध्ये जिल्ह्यातील आठ गावांची नावेच नसल्यामुळे संभ्रम आणखी वाढला आहे. विशेष म्हणजे शासनाने प्रसिद्ध केलेल्या नवीन पत्राचा अर्थ प्रशासनातील अधिकाऱ्यांनाच समजला नसल्याने गोंधळ आणखी वाढला आहे.

### बाधित शेतकऱ्यांचे कार्यालयात खेटे

महामार्गात बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांचे उपविभागीय अधिकारी आणि भूमी अभिलेख कार्यालयात खेटे वाढले आहेत. त्यातच गुगल नकाशामध्ये नव्याने बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी देखील धास्ती घेतल्याने तेदेखील कार्यालयात विचारपूस करत आहेत मात्र प्रशासनाकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही. शेजारच्या सोलापूर जिल्ह्यात शक्तिपीठ महामार्गासंदर्भात हालचाली सुरू आहेत. मात्र धाराशिव जिल्ह्यात सध्या शांतता आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना दिलासा मिळत असला तरी त्यांच्यावर टांगती तलवार कायम आहे.

# तुळजापूर पोलिसांची देवसिंगा येथील जुगार अड्ड्यावर धाड; १.०८ लाखांचा मुद्देमाल जप्त

आरंभ मराठी । तुळजापूर

अवैध जुगार व्यवसायाविरोधात सुरू असलेल्या कारवाईअंतर्गत तुळजापूर पोलिसांनी देवसिंगा परिसरातील एका जुगार अड्ड्यावर धाड टाकून आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्यांच्याकडून जुगार साहित्य व रोख रक्कम असा एकूण १ लाख ८ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ७ जून २०२६ रोजी सायंकाळी तुळजापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने नळदुर्ग रोडवरील देवसिंगा गावालगत असलेल्या हॉटेल सर्जा यांच्या पाठीमागील बंद खोलीवर छापा टाकला. यावेळी जीवन अरुण ज्योत (वय ४४) याच्यासह अन्य सात जण तिरट जुगार खेळत असल्याचे आढळून आले. छाप्यामध्ये पोलिसांनी जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य तसेच रोख रक्कम असा एकूण १,०८,०४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. संबंधित सर्व आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये कलम ४ व ५ अंतर्गत तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# आळणीतील जुगार अड्ड्यावर पोलिसांची छापेमारी

## १२ जण ताब्यात, २२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**धाराशिव** :- धाराशिव जिल्ह्यात अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाने मोहीम अधिक तीव्र केली असून, त्याचाच एक भाग म्हणून लातूर-ढोकी रोडवरील आळणी येथे अवैधरित्या सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत १२ संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, सुमारे २१ लाख ९० हजार ३०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक श्रीमती रीतु खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ८ जून २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. परिमंडळ पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सोमवंशी, सुरेश कासुळे, पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र बहुरे तसेच क्यूआरटी (QRT) व आरसीपी (RCP) पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांना मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे ही योजनाबद्ध छापेमारी करण्यात आली. अळणी येथील 'दर्शन बियर बार आणि परमिट रूम'च्या आडोशाने तीन पत्ती (तिरट) जुगार क्लब चालविला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. संबंधित ठिकाणी पैशांच्या बदल्यात कॉईन्स देऊन जुगार खेळवला जात असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. सदर जुगार अड्डा बारच्या मागील बाजूस असून चहूबाजूंनी शेतांनी वेढलेला असल्यामुळे तो सहज नजरेस पडत नव्हता. मात्र, पोलिसांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकल्याने संशयितांना पळून जाण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. कारवाईदरम्यान घटनास्थळावरून १२ संशयितांना ताब्यात घेण्यात आले. तसेच बार मालक श्रीपाद नारायण वीर याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी जुगारासाठी वापरण्यात येणारे पत्ते, कॉईन्स, मोबाईल फोन, दोन चारचाकी वाहने, चार दुचाकी वाहने तसेच इतर साहित्य असा एकूण रु. २१,९०,३०५ किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# घोडबंदरच्या शिवसृष्टीतून स्वराज्याचा इतिहास जिवंत होणार

## पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांची माहिती,मंत्रालयात आढावा बैठक

आरंभ मराठी । मुंबई

शिवसृष्टी प्रकल्पातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, विचार आणि स्वराज्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचणार आहे. या प्रकल्पामुळे घोडबंदर किल्ल्याच्या परिसराचा विकास होऊन पर्यटनाला चालना मिळेल, असे पपर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले. मंत्रालयातील दालनात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या समवेत मिरा-भाईंदर, (जि. ठाणे) येथे उभारण्यात येणाऱ्या शिवसृष्टी प्रकल्पाच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश र. गटणे, पर्यटन विभागाचे उपसचिव विजय पोवार, पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.सदर बैठकीत शिवसृष्टी प्रकल्पाच्या विविध घटकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रकल्पासाठी लागणारा शंभर टक्के निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.तसेच प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या सर्व वैधानिक परवानग्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत प्राप्त करून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास उपलब्ध करून देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.प्रकल्पाची कामे नियोजित कालावधीत आणि उच्च दर्जाने पूर्ण करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना मंत्री देसाई यांनी दिल्या.याशिवाय, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तो मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात येणार असून, त्याच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिकेकडे सोपविण्यात येणार आहे.घोडबंदर किल्ल्याच्या परिसराचा पर्यटनदृष्ट्या सर्वांगीण विकास करून पर्यटकांसाठी दर्जेदार सुविधा निर्माण करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरणादायी विचार, इतिहास आणि स्वराज्याची परंपरा जतन करून ती नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी शिवसृष्टी प्रकल्प महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शक्तिपीठ महामार्ग तसेच फसव्या कर्जमाफीचा निषेध करण्यासाठी जिल्हा काँग्रेसचे आज आंदोलन

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातून प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्यासाठी तसेच राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटी, धाराशिव आणि शक्तिपीठ बाधित शेतकरी यांच्या संयुक्त विद्यमाने आज (दि.10) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. सकाळी 10.30 वाजता होणाऱ्या या आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी, काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असून, सरकारने जाहीर केलेला शक्तिपीठ महामार्ग तात्काळ रद्द करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात येणार आहे. या महामार्गामुळे सुपीक शेती, शेतकऱ्यांची घरे आणि उपजीविकेची साधने धोक्यात येणार असल्याने बाधित शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याशिवाय राज्य सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी ही फसवी असून, त्याचा प्रत्यक्ष लाभ बहुतांश शेतकऱ्यांना मिळत नसल्याचा आरोप होत आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्याऐवजी सरकार दिशाभूल करणाऱ्या घोषणा करत असल्याचा आरोप करीत या आंदोलनातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारला विविध मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. या आंदोलनात शेतकरी, नागरिक, काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

आरंभ मराठी

## १८ जूनला ९८८ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी तयारी पूर्ण

आरंभ मराठी । धाराशिव

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूकीसाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असून येत्या १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान पार पडणार आहे. या निवडणुकीत एकूण ९८८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून त्यामध्ये ४९९ पुरुष आणि ४८९ महिला मतदारांचा समावेश आहे. मतदारसंख्येच्या तपशीलानुसार, धाराशिव जिल्हा परिषदेचे ६३, जिल्ह्यातील दोन नगरपंचायत व आठ नगरपालिकांचे २५४, लातूर जिल्हा परिषदेचे ६९, लातूरमधील पाच नगरपंचायत, चार नगरपालिका व महानगरपालिकेचे मिळून ३०१, तर बीड जिल्ह्यातील पाच नगरपंचायत व सहा नगरपालिकांचे ३०४ मतदार या




निवडणुकीत सहभागी होणार आहेत. निवडणुकीसाठी धाराशिव जिल्ह्यात ८, लातूर जिल्ह्यात १० आणि बीड जिल्ह्यात ११ अशा एकूण २९ मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली असून सर्व मतदान केंद्रे संबंधित तहसील कार्यालयांमध्ये असणार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ३२ मतदान केंद्राध्यक्ष आणि १२८ इतर मतदान अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये राखीव कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. धाराशिवमध्ये ९ केंद्राध्यक्ष व ३६ अधिकारी, लातूरमध्ये ११ केंद्राध्यक्ष व ४४ अधिकारी, तर बीडमध्ये १२ केंद्राध्यक्ष व ४८ अधिकारी कार्यरत राहणार आहेत. निवडणूक व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी धाराशिवमध्ये ४, लातूरमध्ये ५ आणि बीडमध्ये ५ असे एकूण १४ झोनल अधिकारी नियुक्त करण्यात आले असून संबंधित जिल्ह्यांतील उपविभागीय अधिकारी ही जबाबदारी पार पाडणार आहेत. निवडणूक कर्मचाऱ्यांना तीन टप्प्यांत प्रशिक्षण दिले जात आहे. पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण ५ जून रोजी धाराशिव आणि ६ जून रोजी लातूर व बीड येथे पार पडले. दुसरे प्रशिक्षण अनुक्रमे १२ आणि १३ जून रोजी होणार असून तिसरे व अंतिम प्रशिक्षण १७ जून रोजी तीनही जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात आले आहे. मतदान केंद्रांवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी बँक अधिकाऱ्यांची सूक्ष्म निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. धाराशिवमधील ८ केंद्रांसाठी ११, लातूरमधील १० केंद्रांसाठी १३ आणि बीडमधील ११ केंद्रांसाठी १४ असे एकूण ३८ सूक्ष्म निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. निवडणुकीसाठी आवश्यक मतदान साहित्याचे वितरण १७ जून रोजी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयातून करण्यात येणार आहे. मतदानानंतर साहित्य स्वीकारण्याची प्रक्रिया १८ जून रोजी भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव येथे पार पडेल. तसेच मतमोजणी २२ जून २०२६ रोजी याच ठिकाणी होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

# महिला रुग्णालयात प्रसूतीदरम्यान बाळाचा मृत्यू

## हलगर्जीपणाचा ठपका, डॉक्टर व कर्मचाऱ्याचे निलंबन

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अंतर्गत असलेल्या स्त्री रुग्णालयात प्रसूतीदरम्यान नवजात बाळाचा मृत्यू झाल्याच्या गंभीर प्रकरणात रुग्णालय प्रशासनाने तातडीने कारवाई करत एका महिला डॉक्टरसह चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याला निलंबित केले आहे. या घटनेमुळे रुग्णालयातील वैद्यकीय सेवेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, तुळजापूर येथील कविता प्रवीण जगताप या प्रसूतीसाठी धाराशिवच्या स्त्री रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. दिनांक ५ जून रोजी त्यांची प्रसूती झाली. मात्र प्रसूतीदरम्यान नवजात बाळाचा मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. या घटनेनंतर ८ जून रोजी जगताप यांच्या नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीत गंभीर आरोप करण्यात आले आहेत. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, प्रसूतीदरम्यान संबंधित महिलेची प्रकृती लक्षात घेऊन वारंवार सिझेरियन शस्त्रक्रिया करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र डॉक्टरांनी वेळेत निर्णय घेतला नाही. तसेच प्रसूती सुरू असताना एका पुरुष कर्मचाऱ्याने महिला डॉक्टरांच्या उपस्थितीत प्रसूत महिलेच्या पोटावर जोरदार दाब दिला. या प्रकारामुळेच बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.या तक्रारीची दखल घेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेन्द्र चौहान यांनी प्राथमिक चौकशी केली. प्रथमदर्शनी संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांची निष्काळजीपणा अथवा कार्यपद्धतीतील त्रुटी आढळून आल्याने स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. तृप्ती राडकर आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी सौरभ जाधव यांना तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. याशिवाय संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून चौकशी अहवालानुसार पुढील प्रशासकीय कारवाई केली जाणार असल्याची माहिती अधिष्ठाता डॉ शैलेन्द्र चौहान यांनी दिली. दरम्यान, या घटनेमुळे रुग्णालय प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत असून मृत बाळाच्या कुटुंबीयांनी दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.प्रकरणाची चौकशी पूर्ण झाल्यानंतरच बाळाच्या मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होणार असले तरी या घटनेने जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेबाबत गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

CMYK

# अशा निवडणुका घ्यायच्या तरी कशाला ?

राज्यात उन्हाचा तडाखा थोडाफार कमी झाला असला तरी, येत्या १८ तारखेला होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था  विधान परिषद निवडणुकीतील 'घोडेबाजारा'च्या मुद्यावरुन सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील आरोप-प्रत्यारोपाचे राजकारण मात्र चांगलेच तापले आहे. सर्वसामान्य निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देणारी ही निवडणूक आता त्यांच्यासाठी राहिलेली नाही. कारण, या निवडणुकीच्या उमेदवारांत नेहमीप्रमाणे 'पुढा-यां'च्या घरातील व्यक्तीं व नातेवाईकांचाच जास्त भरणा झालेला दिसत आहे. निवडणूक जाहीर होताच, सत्ताधारी 'महायुती'त जागावाटपाची रस्सीखेच सुरू झाली होती. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या दिल्ली वा-या झाल्यानंतर भाजप ११, शिवसेना व राष्ट्रवादी २ असे जागा वाटप झाले. उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर, आपल्या मुलाचे, मुलीचे, निकटवर्तीयाचे नाव नसल्याने अनेक नेते  नाराज झाले. तशी 'खदखद'ही त्यांनी प्रसारमाध्यमांद्वारे व्यक्त केली होती. नेहमीप्रमाणेच जनतेच्या 'डोळ्यात धूळफेक' करणा-या 'युती' आणि 'आघाडी' या 'गोंडस' संकल्पनेला, स्वस्वार्थासाठी फाट्यावर मारत अनेक इच्छुकांनी 'बंडखोरी'चे निशाण फडकवले. या 'बंडोबां'ना 'थंड' करण्यासाठी विविध 'आश्वासने' आणि 'प्रलोभने' देताना वरिष्ठ नेत्यांची मात्र चांगलीच 'दमछाक' होत आहे. 'महायुती'त १७ पैकी ९ मतदारसंघांत बंडखोरी झाली आहे. बंडखोरांनी माघार घ्यावी, यासाठी वरिष्ठ नेत्यांना साम-दाम-दंड-भेद याचा वापर करत, नाशिक व जळगाव वगळता इतर मतदार संघांत यश आले खरे. पण, नाशिक व जळगावातील बंडखोरांच्या 'नाकदु-या' काढण्यासाठी अजून ही 'जोरबैठका' काढाव्या लागत आहेत. बहुधा, या दोन्ही मतदारसंघांतील भस्मासुरांची 'भूक' मोठी असावी, असे वाटते. 'मविआ'ची मात्र या निवडणुकीत प्रचंड 'नाचक्की' होऊन, 'हात दाखवून अवलक्षण' अशी दयनीय परिस्थिती झाली आहे. शरद पवार गटाच्या श्रीकांत पाटील (पुणे), अभिजित पवार (ठाणे)  तर, उबाठा गटाच्या बाळ माने (सिंधुदुर्ग), देवयानी डोणगावकर (छ, संभाजीनगर) आणि काँग्रेसच्या शैलेश अग्रवाल (वर्धा), साहेबराव कांबळे (यवतमाळ) अशा एकूण ७ अधिकृत उमेदवारांनी लढण्याआधीच आपल्या तलवारी म्यान केल्याने 'मविआ' चांगलीच तोंडघशी पडली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसच्याच एका नेत्याने आपल्या नगरसेवकांना पैसे वाटून विशिष्ट उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन केले असल्याचा दावा खुद्द काँग्रेसच्याच विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.




तर, सिंधुदुर्गचे उमेदवार बाळ माने हे भाजपचे मंत्री नितेश राणे यांना बरोबर घेऊन माघार घ्यायला गेले. पुण्याचे काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी 'शरद पवार यांनी आमचा विश्वासघात केला' अशी टीका केली. 'उबाठा'वर ३ तर, 'शप' गटावर २ नेत्यांची हकालपट्टी करण्याची नामुष्की ओढवली. अशाप्रकारे अंतर्गत धुसफूस प्रचंड वाढल्यामुळे 'मविआ'चे तोंड काळे होऊन, ते दाखवण्याची जागाही शिल्लक राहिली नाही. अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी राज्यभर 'महाभारत' घडून, मतदानाच्या आधीच 'महायुती'ने विजयी 'षटकार' मारला. तर, 'मविआ'चे ७ बळी गेले. 'पॉवर प्ले' च्या षटकांतच 'महायुती'ची बाजू भक्कम झाल्याने हा 'टी-२०' चा सामना 'महायुती'च जिंकेल, व त्याची ही 'नांदी' आहे, अशी चर्चा 'महायुती'च्या गोटात होताना दिसत आहे, मार्च महिन्यात झालेल्या राज्यसभा निवडणुकीतही सर्व ७ उमेदवार बिनविरोध निवडून गेलेले आहेत. अलिकडे काहीही करून, आपल्या मर्जीतील उमेदवार बिनविरोध निवडून आणायचेच, असा 'पायंडा' पाडण्याचा 'विडा' प्रत्येक पक्षांनी उचलला आहे की काय? असा प्रश्न, आजची ही एकंदरीत परिस्थिती बघता, पडल्याशिवाय राहत नाही.

जर, आपली मुलेबाळे, नातेवाईक, निकटवर्तीय यांना बिनविरोध निवडून आणायचे; आणि सर्वसामान्य निष्ठावंत प्रामाणिक कार्यकर्त्याला आयुष्यभर सतरंज्याउचलायलालावायच्याअसतीलतर,कशालाकरताहेनिवडणुकीचे ढोंग? का करता 'लोकशाही'चा अपमान व निवडणूक प्रक्रियेची थट्टा? सरळसरळ तुमच्या मर्जीतील उमेदवारांना विजयी घोषित करा. किमान त्यामुळे कोट्यवधी रुपयांचा होणारा 'घोडेबाजार' तरी होणार नाही. तसेच, घोडेबाजारासाठी वापरला जाणारा पैसा हा तुमचा स्वतःचा किंवा तुमच्या बापाचा नसून, घोटाळे आणि भ्रष्टाचार करून जनतेला लुबाडूनच तो कमावलेला, नव्हे 'लाटलेला' आहे. किमान तो पैसा वाचून सत्कारणी तरी लागेल. निवडणुकीचे आजचे हे 'बकाल' स्वरूप बघता, महाराष्ट्रात निवडणुका घ्यायच्या तरी कशाला? असा संतापजनक प्रश्न पडतो. आताच्या निवडणुकीत जे ६ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. ते सर्व सत्ताधारी 'महायुती'चेच आहेत. या सर्व उमेदवारांची पार्श्वभूमी बघता, ते अतिशय 'धनाड्य' तर आहेच. पण, त्यांची 'राजकीय ताकद'ही प्रचंड मोठी आहे. म्हणून असे उमेदवारच बिनविरोध कसे निवडून येतात? या प्रश्नाचे उत्तर मिळते. आश्चर्य आणि शरमेची बाब म्हणजे, सुनील तटकरे यांचा मुलगा अनिरुद्ध आणि माजी खासदार संजय काकडे यांचा मुलगा विक्रम या दोघांनी स्थानिक स्वराज्य संस्थेत सामाजिक कार्याचा असा कोणता 'भीमपराक्रम' केला म्हणून, त्यांना बिनविरोध निवडून दिले, हा जागतिक स्तरावरील 'संशोधनाचा विषय' होऊ शकतो. केवळ आपल्या बापांकडे असणारा भ्रष्टाचाराचा 'रग्गड पैसा' आणि 'राजकीय ताकद' या निकषांवरच ते फुकटचे आमदार झाले आहेत. वर्ध्यातून बिनविरोध निवडून आलेले अरुण लखाने हे खासदार सुप्रिया सुळे यांचे होणारे व्याही आहेत. त्यामुळे येथेही 'राजकीय ताकद, लागेबांधे' आणि 'प्रचंड पैसा' हे मुद्दे गैरलागू होत नाहीये. ठाण्यातून रवींद्र फाटक आणि यवतमाळमधून दुष्यंत चतुर्वेदी हे बिनविरोध निवडून आले. हे दोघेही माजी आमदार असल्यामुळे पैसा आणि राजकीय ताकद हे मुद्दे उपस्थित होतातच. 'मविआ'कडे पुरेसे संख्याबळ नसल्याने कोणतीही जागा अगदी सहजपणे जिंकणे त्यांना शक्य नाही. पण, याचा अर्थ असा होत नाही की, त्यांनी निवडणूकच लढू नये. पक्षाचा एबी फॉर्म घेऊन, उमेदवारी अर्ज भरायचा; आणि ऐनवेळी तो माघारी घेऊन पक्षाच्या 'इज्जतीचे धिंडवडे' का आणि कशासाठी काढायचे? या मागे काय कारण असावे? पडद्याआड काय 'व्यवहार' होतात? या प्रश्नांची उत्तरे आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसाला कधीच मिळू शकणार नाहीत. परंतु, पक्षाचा उमेदवारी अर्ज भरून, माघारीसाठी समोरच्या उमेदवारावर जास्तीत जास्त रक्कम मिळवण्यासाठी दबाव टाकणे, हेच कारण असावे, असा कयास मात्र आपण निश्चिंतच करू शकतो.

कारण, अगदी सहजासहजी आणि निस्वार्थपणे माघार घेणारे 'हरिश्चंद्राचे अवतार'  'सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता' असे व्यावसायिक स्वरुप आलेल्या आजच्या 'सडक्या' आणि 'बाजारू' राजकारणातून केव्हाच 'इतिहासजमा' झाले आहेत. हा अतिशय गंभीर आणि महत्त्वाचा प्रश्न केवळ राजकारणापुरताच मर्यादित नसून, हा लोकशाही व मतदारांचा घोर अपमान तर आहेच. पण, निवडणूक प्रक्रियेच्या 'अब्रूचे लक्तरे वेशीवर टांगण्याचा' नीच प्रकार आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. पुण्याची जागा 'शप' गटाने काँग्रेसकडून मागून घेऊन तेथे श्रीकांत पाटील हा आपला अधिकृत उमेदवार उभा केला होता. तर, राष्ट्रवादीतर्फे विक्रम काकडे रिंगणात होते. सुनेत्रा पवारांनी शरद पवार यांना, त्यांच्या उमेदवाराने माघार घ्यावी, असा फोन केला, त्वरित काकांनी श्रीकांत पाटील याना माघारीचे आदेश दिले. माघारीमुळे आपण काँग्रेसचा 'केसाने गळा कापून' विश्वासघात करत आहोत, हा साधा विचार करण्याची गरजही त्यांना वाटली नाही. कदाचित, विक्रम काकडेने जय पवार यांना १० कोटी रुपये दिल्याची बातमी त्यांनी बघितली असावी. १८ जूनलाच देशातील १० राज्यांतील २४ रिक्त जागांसाठी राज्यसभेचीही निवडणूक होत आहे. सुनेत्रा पवार यांच्या रिक्त जागेसाठी छगन भुजबळ इच्छुक आहेत, पक्षाकडूनही जवळजवळ त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. पण, या महाशयांनी सुनील तटकरे यांच्या  कुटुंबातील तिघांना संधी, मग माझ्यावरच अन्याय (?) का? असा प्रश्न उपस्थित करून, आपल्या रिक्त होणा-या जागेवर पुतण्या समीर भुजबळ यालाच उमेदवारी देऊन, कॅबिनेट मंत्रीपदही त्यालाच मिळाले पाहिजे, असा पक्षाकडे हट्ट धरला आहे. या २ चालू उदाहरणांवरून आपला आणि कुटुंबाचा स्वार्थ साधण्यासाठी हे 'संधीसाधू' कसे सोईचे राजकारण खेळतात, हे अधोरेखित होते. सर्वसामान्य नागरिकांना सतत प्रामाणिकपणा व नियम पाळण्याचे डोस देणा-या सर्वच पक्षांच्या 'संधीसाधूं'ना आता नीतिमत्ता आणि योग्य-अयोग्यतेचा 'बुस्टर डोस' देण्याची वेळ आली आहे, हे मात्र नक्की. आपल्या स्वार्थासाठी सोईनुसार 'मॅनेज' होत असणा-या अशा निवडणुका बघता, पुढील प्रश्न पडल्याशिवाय राहत नाहीत. 'बिनविरोध' ही संकल्पना नीतिमत्तेला धरून आहे का? अशा निवडणुकांची खरेच गरज आहे का? जनमताचा सन्मान उरला आहे की नाही? 'उमेदवार हे खरेच आपल्या कर्तृत्वावर 'बिनविरोध' निवडून येतात की 'सेटिंग करुन? अशा 'सेटिंग' निवडणुका होऊन लोकशाहीची पायमल्ली होत असेल, तर निवडणुका घ्यायच्या तरी कशाला? असा गंभीर आणि संतापजनक प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.'

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
नाशिक.
८७६७५९२९८०

# सेवानिवृत्ती : थांबा नव्हे नवी सुरुवात





**किशोर जाधव,**
सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

३१ मे रोजी शासनाच्या विविध कार्यालयांतील अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले. तृतीय श्रेणीतील कर्मचारी ५८ वर्षे पूर्ण झाल्यामुळे, तर चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी वयाची साठी पूर्ण झाल्यामुळे सेवामुक्त झाले. अनेकांनी अश्रूनयनांनी आपल्या सहकाऱ्यांचा आणि कार्यालयाचा निरोप घेतला. हा दिवस भावनांनी ओथंबलेला होता. सेवानिवृत्त होणाऱ्यांचे मन दाटून आले होते. निरोप देणे नकोसे झाले होते. मनातील भावनांना वाट मोकळी करून देताना अनेकांच्या अश्रूंचा बांध फुटला. माणसाचे जीवन हे गतिशील असते. या गतिशील जीवनात स्थैर्य आणि शिस्त येते ती नोकरीमुळे. नोकरीत कर्मचारी इतका गुरफटून जातो की, दररोजचे कार्यालयीन कामकाजच त्याचे जीवन बनून जाते. त्यातूनच तो स्वतःची ओळख निर्माण करतो. जीवनातील ३० ते ३५ वर्षे एखाद्या शासकीय कार्यालयात कशी भराभर निघून जातात, हे त्यालाही कळत नाही.

शिक्षकांसाठी तर सेवानिवृत्ती म्हणजे भरल्या घरातून निघून जाण्यासारखी असते. शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी, त्यांचे भावविश्व, त्यांचे हसरे चेहरे आणि त्यांच्याशी होणारा आदरयुक्त संवाद यापासून आता दूर व्हावे लागणार असते. विद्यार्थी घडवता घडवता स्वतःचे जीवन समृद्ध करून घेणारा शिक्षक आता त्या विद्यार्थीप्रेमाला मुकणार असतो. अध्ययन-अध्यापन ही एक प्रयोगशील प्रक्रिया आहे. इतर कामकाजांच्या तुलनेत येथे नावीन्य, सर्जनशीलता आणि कलात्मकता जपण्याची मोठी संधी असते. शिक्षकांचा प्रत्येक दिवस नवीन असतो. आपल्यापेक्षा कमी वयाच्या विद्यार्थ्यांची बोलण्यातील चपळता, निरागसता आणि लडिवाळपणा हळूहळू शिक्षकाच्या स्वभावात उतरलेला असतो. त्यामुळे बाहेर कुठेही गेल्यावर त्याच्या मवाळ, प्रेमळ आणि मधुर बोलण्यामुळे, "तुम्ही शिक्षक आहात का?" असा प्रश्न सहज विचारला जातो. समोरच्या व्यक्तीचा आदर राखणे, तिचे व्यक्तिस्वातंत्र्य जपणे आणि तिच्या भावनांना हळुवार फुंकर घालणे, हे विद्यार्थ्यांशी नाते जपत असताना शिक्षकाच्या अंगवळणी पडते. 'मुले म्हणजे देवाघरची फुले' असे म्हणतात. या फुलांचा सुगंध घेण्याची आणि त्यांना हळुवारपणे फुलवण्याची खरी कसोटी शिक्षकाचीच असते. ही फुले पुढे कोणत्या फुलदाणीत अधिक सुंदर दिसतील, यासाठी त्यांना घडवण्याचे कार्य शिक्षक करत असतो. कधी प्रेमाने तर कधी रागावून तो विद्यार्थ्यांना योग्य दिशा देत असतो. सेवेनंतरचे जीवन कसे जगायचे, याचा ठोस आराखडा नसतानाच अनेकजण घरी परततात. पुढील दिवस काहीसे नकोसे वाटू लागतात. दिनचर्या बदलते. घरातील माणसे आणि बाहेरील समाज आपल्याला कितपत समजून घेईल, याचीही शाश्वती नसते. शिक्षक म्हणून आयुष्याचा बराच काळ विद्यार्थ्यांसोबत घालवल्यानंतर आपणदेखील त्यांच्यासारखेच निरागस झालो आहोत, याची जाणीव सेवानिवृत्तीनंतरच्या काही दिवसांत होऊ लागते. समाज जेव्हा कठोर वास्तवाची जाणीव करून देतो, तेव्हा शाळेच्या चार भिंतीतील भावविश्व किती समृद्ध होते याची प्रकर्षाने जाणीव होते. आता कुटुंबाला भरपूर वेळ देता येईल, असे वाटते; परंतु त्यांनाही आपल्या सहवासाची किती गरज आहे, याचाही विचार करावा लागतो. 'सेवानिवृत्तीनंतर काय करायचे?' हा प्रश्न अनेकांना सतावत असतो. जीवन जिथे घेऊन जाईल तिकडे वाहवत जायचे की स्वतः काही नियोजन करायचे, हे प्रत्येकाने ठरवले पाहिजे. आपल्या आवडी-निवडी, छंद जोपासताना शरीर आणि मनाचे आरोग्य जपण्याचेही नियोजन आवश्यक असते. जीवनप्रवासाची रेल्वे आता एका नव्या जंक्शनवर येऊन थांबलेली असते. येथून पुढे अनेक दिशांना जाण्याचे मार्ग खुले असतात. गाडी त्याच स्थानकावर कायम उभी ठेवणे योग्य नसते. म्हणूनच सेवानिवृत्ती म्हणजे थांबा नव्हे, तर नव्या प्रवासाची सुरुवात आहे, हा दृष्टिकोन स्वीकारला तर पुढील जीवन अधिक सुखी, समाधानी आणि समृद्ध होऊ शकते. रोजचा हलकासा व्यायाम, चालणे, योगाभ्यास यांमुळे शरीर आणि मनाला उभारी मिळते. हलका आहार, पुरेशी झोप आणि नियमित दिनचर्या यांना प्राधान्य दिले पाहिजे. भेटीगाठी, गप्पागोष्टी आणि सामाजिक सहभाग यांमधून मनातील विचारांना अभिव्यक्त होण्याची संधी मिळते. सेवानिवृत्तीनंतर एखादा नवा उपक्रम हाती घेऊन तो यशस्वीपणे पूर्ण करण्याचा संकल्प केला, तर जीवनाला नवे अर्थ प्राप्त होतात. वार्धक्य ही केवळ शारीरिक किंवा वैद्यकीय अवस्था नसून ती मानसिक आणि सामाजिक प्रक्रियादेखील आहे. या अवस्थेचा सकारात्मक स्वीकार करून मन, भावना आणि शरीर यांचा समतोल राखत जीवनाचा पुढील टप्पा आनंदाने जगण्यातच खरा शहाणपणा आहे. जिंदगीकेसफरमेंगुजरजातेहैंजोमकामवोफिरनहींआते,वोफिरनहींआते... असं म्हणत सेवानिवृत्त होऊन घरी जात असताना, सेवानिवृत्ती म्हणजे शेवट नव्हे; ती अनुभवांच्या शिदोरीसह सुरू होणारी जीवनाची दुसरी, अधिक समृद्ध आणि अर्थपूर्ण इनिंग आहे. हा दृष्टिकोन तयार केला तर  अजून पुढे नवनवीन सुंदर मकाम भेटत जातील...

# अंधारलेल्या आयुष्यात प्रकाश पेरणारा भालचंद्र



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५



आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद    यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे.ते महाराष्ट्रातील असून, त्यांचा जन्म १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशिवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे.

**जागतिक नेत्रदान दिन विशेष**

अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी. मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते. नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

# उमरग्यात भरदिवसा घरफोडी; सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह पावणे तीन लाखांचा ऐवज लंपास

**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा शहरातील डिग्गी रोड परिसरात अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी करत सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह तब्बल २ लाख ७५ हजार २५० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अब्दुल वाहब शमशोद्दीन शेख (लदाफ), वय ३८ वर्षे, रा. डिग्गी रोड, उमरगा हे दि. ८ जून २०२६ रोजी



सकाळी घराबाहेर असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटांची झडती घेत चोरट्याने २४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच १२ तोळे वजनाचे चांदीचे दागिने असा एकूण २,७५,२५० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. घटना उघडकीस आल्यानंतर अब्दुल वाहब शेख यांनी उमरगा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या प्रथम खबरीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०५(अ) व ३३१(४) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि.  धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
» पुणे कार्यालयः 1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

# लाजा सोडल्या! आई तुळजाभवानीच्या पवित्र दरबारातही पिचकाऱ्या; १० निर्लज्जांवर कारवाई

## अशांना मंदिरात प्रवेश नाकारावा, भाविकांची मागणी

आरंभ मराठी । तुळजापूर



सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याची सवय किती बोकाळली आहे, याचा नमुना थेट महाराष्ट्राच्या कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या पवित्र मंदिर परिसरात दिसून येत आहे. ज्या ठिकाणी लाखो भाविक श्रद्धेने माथा टेकतात, त्या तीर्थक्षेत्रालाही काही महाभागांनी पान-गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी विद्रूप करण्याचा उद्योग सुरूच ठेवला आहे. अखेर मंदिर प्रशासनाने अशा १० जणांना रंगेहात पकडत त्यांच्याकडून ५ हजार रुपयांचा दंड वसूल केला. मात्र, एवढी कारवाई पुरेशी नसून, अशा निर्लज्ज लोकांना मंदिरात प्रवेश दिला जाऊ नये अशी मागणी भाविकातून होत आहे. मंदिर परिसर म्हणजे कुणाच्या बापाची जहागीर नसून ते कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. मात्र याचे भान हरपलेल्या काही निर्लज्ज व्यक्ती सर्रास थुंकून परिसर अस्वच्छ करत असल्याचे वास्तव समोर आले आहे. मंदिर संस्थानच्या विशेष पथकांनी गस्तीदरम्यान अशा १० जणांना पकडले आणि प्रत्येकाकडून ५०० रुपयांचा दंड वसूल केला. प्रश्न फक्त ५ हजार रुपयांच्या दंडाचा नाही तर प्रश्न आहे तो संस्कारांचा आणि श्रद्धेचा. देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या डोळ्यांसमोर मंदिर परिसरातच पान-गुटख्याच्या पिचकाऱ्या मारणाऱ्यांवर केवळ आर्थिक दंड पुरेसा आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. अशा प्रवृत्तीच्या लोकांवर काही काळासाठी मंदिर प्रवेशबंदीची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भाविकांमधून जोर धरत आहे. मंदिर प्रशासनाने परिसर स्वच्छ आणि पवित्र राखण्यासाठी कठोर मोहीम सुरू केली असून सहायक स्वच्छता निरीक्षकांच्या नेतृत्वाखाली दोन विशेष पथके दररोज पाहणी करत आहेत. थुंकणे, घाण करणे, कचरा टाकणे अशा प्रकारांना यापुढे अजिबात पाठीशी घातले जाणार नसल्याचा स्पष्ट इशाराच प्रशासनाने दिला आहे.

# जावयाऐवजी अनाथ-दिव्यांग बालकांना धोंडे जेवण

## मुळजच्या महिला भगिनींचा उपक्रम



आरंभ मराठी । उमरगा

पुरुषोत्तम मासाचे औचित्य साधत उमरगा तालुक्यातील मुळज येथील समाजसेविका सुरेखा भोसले आणि त्यांच्या सहकारी महिला भगिनींनी सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबविला. पारंपरिक पद्धतीने जावयाला 'धोंडे जेवण' घालण्याऐवजी त्यांनी एकुरगावाडी येथील तुळजाभवानी अपंग मतिमंद अनाथ बाळगृहात जाऊन तेथील बालकांना प्रेमाने गोडधोड 'धोंडे जेवण' दिले. हिंदू संस्कृतीत अधिक मास अर्थात 'धोंडा महिना' विशेष महत्त्वाचा मानला जातो. या काळात जावयाला किंवा नातेवाईकांना धोंड्याचे जेवण देण्याची परंपरा आहे. मात्र, मुळज येथील महिला भगिनींनी या परंपरेला सामाजिकतेची जोड देत समाजातील वंचित, अपंग आणि अनाथ बालकांमध्येच देव शोधण्याचा प्रयत्न केला. यावेळी बाळगृहातील सर्व मुलांना अत्यंत प्रेमाने आणि आपुलकीने गोडधोड जेवण वाढण्यात आले. महिलांनी केवळ भोजनदानच केले नाही, तर मुलांशी संवाद साधत त्यांच्यासोबत काही वेळ घालवला. त्यामुळे बाळगृहातील वातावरण आनंदी, उत्साहपूर्ण आणि भावनिक बनले होते. या अनोख्या 'धोंडे दाना'च्या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे

# धाराशिव जिल्हा माहेश्वरी युवा संघटनेची नूतन कार्यकारिणी बिनविरोध

## समाजहिताचे उपक्रम राबविण्याचा निर्धार

आरंभ मराठी । धाराशिव




धाराशिव जिल्हा माहेश्वरी युवा संघटनेच्या नूतन कार्यकारिणीची निवड रविवारी बालाजी मंदिर येथे झालेल्या बैठकीत बिनविरोध करण्यात आली. ज्येष्ठ समाजसेवक तथा निवडणूक अधिकारी मदन काकाजी मिनियार यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. बैठकीस जिल्ह्यातील युवा कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. नव्या कार्यकारिणीमार्फत समाजहिताचे विविध उपक्रम राबविणे, युवकांना संघटित करणे आणि सामाजिक कार्याला अधिक गती देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. यामध्ये अध्यक्षपदी श्रीकृष्ण मुंदडा, सचिवपदी गोकुळ बांगड, उपाध्यक्षपदी संकेत जाजू व अक्षय तोतला, सहसचिवपदी सुयोग काकानी व व्यंकटेश मुंदडा, संघटन मंत्रीपदी योगेश सारडा, अर्थमंत्रीपदी मोहित मंत्री, सांस्कृतिक मंत्रीपदी रामजी मुंदडा, आरोग्यमंत्रीपदी संतोष मिनियार, क्रीडामंत्रीपदी शैलेश बांगड, समाज कल्याण मंत्रीपदी गोकुळ भराडिया, जनसंपर्क मंत्रीपदी सुजित दरक तर आयटी प्रमुखपदी सिद्धांत भन्साळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.निवडीनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. युवा शक्तीच्या माध्यमातून समाज विकासासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा विश्वास नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

# भूम भाजपमध्ये नाराजीचा सूर; निवडणूक निर्णयांवर ज्येष्ठ कार्यकर्त्यांची नाराजी

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीचा पर्याय नाकारल्याचा फटका बसल्याचे कार्यकर्त्यांचे मत

आरंभ मराठी । भूम

भूम शहर व तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ, निष्ठावान आणि तळागाळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढत आहे. मागील नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये पक्षाने घेतलेल्या निर्णयांबाबत कार्यकर्त्यांकडून उघडपणे प्रश्न उपस्थित केले जात असून उमेदवारी वाटप, युती धोरण आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहभागाबाबत असंतोष व्यक्त केला जात आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांपूर्वी झालेल्या बैठकीत अनेक कार्यकर्त्यांनी महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढविण्याचा आग्रह धरला होता. स्थानिक राजकीय परिस्थितीचा विचार करता हा पर्याय अधिक लाभदायक ठरेल, असे मत मांडण्यात आले होते. मात्र पक्षाने स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर झालेल्या निवडणुकांमध्ये भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही आणि एकही उमेदवार निवडून आला नाही. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये निराशेचे वातावरण निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. उमेदवारी वाटपाच्या प्रक्रियेत अनेक वर्षे पक्षासाठी काम करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलण्यात आल्याची भावना देखील पक्षात व्यक्त होत आहे. त्याऐवजी नुकतेच पक्षात दाखल झालेल्या काही व्यक्तींना संधी देण्यात आल्याने जुन्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढला आहे. भूम नगरपालिकेच्या निवडणुकीवेळीही स्थानिक कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता काही मोजक्या पदाधिकाऱ्यांच्या सल्ल्याने इतर पक्षांसोबत निवडणूक लढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याची चर्चा आहे. या निर्णयामुळे भाजपची स्वतंत्र राजकीय ताकद आणि ओळख प्रभावीपणे मतदारांसमोर मांडता आली नाही, असा आरोप काही कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. परिणामी नगरपालिकेत पक्षाच्या वाट्याला अत्यल्प जागा आल्याचेही कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. याशिवाय, पक्ष सत्तेत नसताना फारसे सक्रिय नसलेले काही नेते सत्तांतरानंतर प्रभावशाली बनल्याची चर्चा देखील सुरू आहे. स्थानिक परिस्थितीबाबत वरिष्ठ नेतृत्वाला चुकीची माहिती दिल्याने काही निर्णय वास्तवापासून दूर राहिले आणि त्याचा परिणाम निवडणूक निकालांवर झाल्याचा आरोपही काही कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप नेतृत्व या नाराजीची दखल घेऊन कोणती भूमिका घेते, याकडे भूम तालुक्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी विलास राठोड यांची निवड



आरंभ मराठी । नळदुर्ग

तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथील सामाजिक कार्यकर्ते विलास राठोड यांची देशातील बंजारा समाजाची अग्रगण्य संघटना म्हणून ओळख असलेल्या राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे बंजारा समाजासह विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. अक्कलकोट येथील शांतिस्थळ येथे संत धावजी बापू महाराज यांच्या पुण्यस्मरण यात्रामहोत्सवानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ही निवड जाहीर करण्यात आली. राष्ट्रीय बंजारा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा उद्योगपती किसन राठोड यांच्या हस्ते विलास राठोड यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी पोहरादेवी धर्मपीठाचे धर्मगुरू महंत जितेंद्र महाराज, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मोहन चव्हाण, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष उमेश राठोड, कार्याध्यक्ष संतोष राठोड, प्रभारी राजेश पवार, राष्ट्रीय सल्लागार शिवाजी राठोड, धाराशिव जिल्हाध्यक्ष वसंत पवार, कार्याध्यक्ष किरण राठोड यांच्यासह राज्यभरातील प्रमुख महंत आणि राष्ट्रीय बंजारा परिषदेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विलास राठोड यांनी यापूर्वी राष्ट्रीय बंजारा परिषद तुळजापूर तालुकाध्यक्ष तसेच धाराशिव जिल्हाध्यक्ष म्हणून यशस्वीपणे काम केले आहे.

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पुरेशा पावसानंतरच पेरणी करावी; कृषी विभागाचे आवाहन

**तामलवाडी** :- यंदाच्या खरीप हंगामावर अल निनोचे सावट असल्याने पावसाचे असमान वितरण, पावसाचा खंड तसेच कमी-अधिक पावसाची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी न करता किमान ७५ ते १०० मिलिमीटर पाऊस झाल्यानंतर आणि जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाल्यानंतरच पेरणी करावी, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले. पांगरदरवाडी येथे कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम नियोजनाबाबत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी काटी कृषी मंडळ अधिकारी विठ्ठल नागटिळक यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना हवामानातील बदलांचा विचार करून योग्य नियोजन करण्याची गरज अधोरेखित केली.

दैनिक आरंभ मराठी

## विजेपासून बचाव करण्यासाठी उपाययोजना आवश्यक

# अवकाळी पावसात पडू शकतात विजा; नागरिकांनी सावध राहण्याची गरज

आरंभ मराठी । कळंब

**कळंब - सध्या उन्हाची वाढलेली प्रचंड तीव्रता आणि वातावरणात होणारे अचानक बदल बऱ्याच ठिकाणी पाहायला मिळत आहेत. अवकाळी पावसाची शक्यताही या वातावरणात नाकारता येत नाही. अवकाळी मध्ये विजांचा कडकडाट सुरु होतो आणि वीज पडून जीवित हानी झाल्याचेही कांही ठिकाणी पाहायला मिळते. योग्य काळजी घेणे हा एकमेव पर्याय विजेपासून आपल्याला वाचवू शकतो. हवामानातील अचानक होणारे बदल आणि ढगांमधील विद्युतभाराचे असंतुलन यामुळे विजा पडण्याच्या घटनांमध्ये वाढ होते.**

ग्रामीण भागात शेतात काम करणारे शेतकरी, मोकळ्या जागेत असलेले नागरिक तसेच झाडाखाली आश्रय घेणाऱ्यांना विजांचा सर्वाधिक धोका असतो. त्यामुळे नागरिकांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीच्या काळात वातावरणातील उष्णता आणि आर्द्रता मोठ्या प्रमाणात वाढते. या परिस्थितीत ढगांमध्ये सकारात्मक आणि नकारात्मक विद्युतभार तयार होतो. विद्युतभाराचा फरक वाढल्यानंतर तो अचानक जमिनीकडे किंवा एका ढगातून दुसऱ्या ढगात प्रवाहित होतो. यालाच वीज पडणे असे म्हटले जाते. विजेच्या एका झटक्यात लाखो व्होल्ट विद्युतप्रवाह निर्माण होत असल्याने मनुष्य, जनावरे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान होऊ शकते.



### ग्रामीण भागात अधिक धोका

शेतात नांगरणी, पेरणी किंवा इतर कामे करत असताना अनेक शेतकरी मोकळ्या जागेत असतात. विजा पडण्याच्या घटना प्रामुख्याने उंच झाडे, विद्युत खांब, मोबाईल टॉवर, डोंगरमाथे किंवा मोकळी मैदाने येथे घडतात. त्यामुळे मेघगर्जना सुरू होताच सुरक्षित ठिकाणी जाणे आवश्यक आहे. अनेकदा पावसापासून बचावासाठी झाडाखाली थांबण्याची सवय जीवघेणी ठरू शकते.

### '३०-३० नियम' ठरू शकतो जीव वाचवणारा

आकाशात वीज चमकल्यानंतर ३० सेकंदांच्या आत गडगडाट ऐकू आला, तर वादळ अगदी जवळ असल्याचे समजावे. अशावेळी तातडीने सुरक्षित ठिकाणी जावे. शेवटचा गडगडाट ऐकू आल्यानंतर किमान ३० मिनिटे बाहेर पडू नये, असा सल्ला हवामान तज्ज्ञ देतात.

### विजा पडण्याची प्रमुख कारणे

वातावरणात वाढलेली उष्णता व आर्द्रता.
उंच ढगांची निर्मिती आणि मेघगर्जना.
ढगांमध्ये विद्युतभाराचे असंतुलन.
वादळी वाऱ्यांमुळे ढगांची तीव्र हालचाल.
अवकाळी पाऊस आणि हवामानातील अचानक बदल.

### विजांपासून बचावाचे उपाय

मेघगर्जना सुरू होताच घरात किंवा मजबूत इमारतीत आश्रय घ्या.
* झाडाखाली, मोकळ्या मैदानात किंवा उंच ठिकाणी उभे राहू नका.
* मोबाईल चार्जिंगला लावून वापरणे टाळा.
* विद्युत उपकरणांचे प्लग काढून ठेवा.
* शेतात असल्यास तात्काळ सुरक्षित ठिकाणी जा.
* मोटारसायकल, सायकल किंवा ट्रॅक्टरवर उघड्यावर थांबू नका.
* पाण्याच्या ठिकाणांपासून दूर राहा.
* विजांचा कडकडाट सुरू असताना धातूच्या वस्तूंना स्पर्श करणे टाळा.

### चारचाकी गाडीवर (कारवर) वीज पडू शकते का?

होय, चारचाकी गाडीवर (कारवर) वीज पडू शकते. मात्र, चांगली गोष्ट म्हणजे कारच्या आत बसलेले लोक बहुतेक वेळा सुरक्षित राहतात. कारचे धातूचे बाह्य आवरण 'फॅराडे केज (Faraday Cage)' प्रमाणे काम करते. वीज कारवर पडल्यास विद्युतप्रवाह कारच्या बाहेरील धातूच्या भागातून जमिनीकडे जातो आणि साधारणपणे प्रवाशांच्या शरीरातून जात नाही.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात विभागीय सुसंवाद उपक्रमाला प्रतिसाद



आरंभ मराठी । धाराशिव

महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल), मुंबई आणि तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने 'विभागीय सुसंवाद-२०२६' या मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अभियांत्रिकी, वैद्यकीय व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थी व पालकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात नानासाहेब फटांगरे, सिद्धेश्वर नर, कुणाल देवकर, शार्दुल कदम, प्रमोद झरकर तसेच प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी प्रवेश प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, करिअरच्या संधी आणि प्रवेशातील महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन केले. परसेंटेज-परसेंटाइलमधील फरक, लेटरल एन्ट्री, चॉईस कोड निवडताना घ्यावयाची काळजी याबाबतही माहिती देण्यात आली. महाविद्यालयात सेमिनार हॉलसह तीन कक्षांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच युट्यूबद्वारे कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणही करण्यात आले. शेवटी विद्यार्थी व पालकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हाभरातील विद्यार्थी, पालक, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मान्सूनची चाहूल, पेरणीसाठी लगबग; वाढत्या खर्चाचे शेतकऱ्यांसमोर आव्हान

## बियाणे, खत आणि इंधन दरवाढीमुळे आर्थिक गणित बिघडले

दत्ता अहिरे । आरंभ मराठी

**भूम; मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागताच भूम तालुक्यातील शेतशिवारात पेरणीपूर्व कामांना वेग आला आहे. मान्सूनपूर्व पावसाच्या सरींमुळे जमिनीत आवश्यक ओलावा निर्माण झाल्याने शेतकरी मशागतीच्या कामात व्यस्त झाला आहे. नांगरणी, पाळी, मोगडणीसह पेरणीपूर्व तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असली, तरी वाढलेले बियाणे, खत आणि इंधनाचे दर यामुळे यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी अधिक खर्चिक ठरत आहे. पावसाबाबत आशावाद असला तरी वाढत्या उत्पादन खर्चामुळे आर्थिक चिंता कायम असल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.**

गेल्या पंधरा दिवसांपासून शेतकरी बांधव शेतीच्या मशागतीच्या कामात गुंतले आहेत. मान्सूनपूर्व सरींमुळे शिवारात चैतन्य निर्माण झाले असून पेरणीसाठी आवश्यक तयारी पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे. भूम तालुक्यात खरीप हंगामात सर्वाधिक क्षेत्रावर सोयाबीनची लागवड केली जाते. नगदी पीक म्हणून सोयाबीनकडे पाहिले जात असले तरी गेल्या काही वर्षांपासून वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित विस्कळीत झाले आहे. गतवर्षी अतिवृष्टीमुळे तालुक्यातील अनेक भागांतील उभी पिके पाण्यात गेली होती. काही ठिकाणी शेतजमिनीतील सुपीक माती वाहून गेल्याने मोठे नुकसान झाले होते. त्यातच सोयाबीनला अपेक्षित बाजारभाव न मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या हातात पैसा आला नाही. या पार्श्वभूमीवर यंदाच्या हंगामासाठी पुन्हा मोठी आर्थिक गुंतवणूक करावी लागत आहे. ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलचे वाढलेले दर, महागलेली बियाणे आणि खतांच्या किमती यामुळे पेरणीचा खर्च वाढला आहे. दरम्यान, कृषी विभागाने खरीप हंगामासाठी आवश्यक नियोजन सुरू केले असून शेतकऱ्यांना योग्य वेळेत पेरणी करण्याचे आवाहन केले आहे. पुरेसा पाऊस आणि योग्य वापसा झाल्यानंतरच पेरणी करावी, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. तसेच बियाण्यांची उगवणक्षमता तपासून रुंद वरंबा पद्धतीचा अवलंब करण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.






### भूम तालुक्याला ११७.५० क्विंटल सोयाबीन बियाण्यांचा कोटा

राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत भूम तालुक्यास यंदा ११७.५० क्विंटल सोयाबीन बियाण्यांचा कोटा मंजूर झाला आहे. महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी केलेल्या पात्र शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर बियाण्यांचे वितरण सुरू आहे. केडीएस-९९२, केडीएस-७३५, एमएसीएस-१४६०, एमएयूएस-७२५ आणि समृद्धी या वाणांचा समावेश असून एका शेतकऱ्यास कमाल ७५ किलो बियाणे मंजूर होणार आहे. तालुक्यातील अधिकृत कृषी सेवा केंद्रांमार्फत बियाण्यांचे वितरण सुरू करण्यात आले आहे.

### भूम तालुक्यात सोयाबीनचा पेरा वाढला

भूम तालुक्यातील खरीप क्षेत्रापैकी सुमारे ७० ते ८० टक्के क्षेत्रावर सोयाबीनची लागवड केली जाते. नगदी पीक म्हणून सोयाबीनला शेतकऱ्यांची पसंती असली तरी उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि मशागतीचा खर्च वाढल्याने शेतीचे अर्थकारण बदलले आहे. उत्पादन वाढले तरी बाजारभावाचा प्रश्न कायम असल्याने शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत.

### पेरणीबाबत कृषी विभागाचा काय आहे सल्ला ?

कृषी विभागाने १५ जून ते १५ जुलै हा खरीप पेरणीसाठी योग्य कालावधी असल्याचे सांगितले आहे. किमान १०० मिलिमीटर पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी, असा सल्ला देण्यात आला आहे. बियाण्यांची उगवणक्षमता तपासून पेरणी करणे, रुंद वरंबा पद्धतीचा वापर करणे आणि योग्य वापसा आल्यानंतरच शेतीची कामे सुरू करणे आवश्यक असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. वेळेवर आणि शास्त्रोक्त पद्धतीने पेरणी केल्यास उत्पादनवाढीस मदत होऊ शकते.

# विकसित भारत बिल्डकॉन स्पर्धेत वैष्णवी केदारे जिल्ह्यात प्रथम



आरंभ मराठी । उमरगा

उमरगा शहरातील आय एस ओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल मधील इयत्ता आठवीच्या वैष्णवी केदारे, पलक वरवटे, खुशी शिरसले, पूजा मोरे या टीमने सादर केलेल्या एम्पॉवरिंग गर्ल्स या थीमला जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळाल्याने धाराशिव जि प च्या उपाध्यक्षा तथा शिक्षण सभापती उषाताई गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी धाराशिवचे माजी खासदार रवींद्र गायकवाड नगराध्यक्ष किरण गायकवाड सौ. शिवाई गायकवाड सदानंद शिवदे पाटील, प्रदीप मदने, प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे, नागेश स्वामी, सोनाली मुसळे उपस्थित होते. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या मार्गदर्शनानुसार अटल इनोवेशन मिशनद्वारे आयोजित विकसित भारत बिल्डकॉन 2025 ची मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण होऊन राष्ट्रीय राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय विजेत्यांची निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेत देशातील विद्यार्थ्यांच्या अभूतपूर्व प्रतिसादाची नोंद घेत गीनीज वर्ल्ड रेकॉर्ड द्वारे या स्पर्धेला सर्वात मोठी नवोन्मेष स्पर्धा म्हणून गौरविण्यात आले. या ऐतिहासिक यशाचा गीनीज पुरस्कार वितरण सोहळा 25 मे 2026 रोजी नवी दिल्ली येथे पार पडला.

# शिवराज्याभिषेक दिनी धाराशिव सेवक फाउंडेशनचे स्वच्छता, वृक्षारोपण व अन्नदान अभियान

**धाराशिव** :- शिवराज्याभिषेक दिनानिमित्त धाराशिव सेवक फाउंडेशनच्या वतीने धाराशिव लेणी येथे स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण आणि मातोश्री वृद्धाश्रमात अन्नदान उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात आस्था स्कुल ऑफ नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. धाराशिव लेणी परिसर स्वच्छ करून ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा संदेश देण्यात आला, तर वृद्धाश्रमातील अन्नदानातून समाजसेवेचा आदर्श घालून देण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात गणेश वाघमारे, विवेक यादव, विजय राठोड, दिनेश देवकते, प्रकाश चव्हाण, बाबासाहेब गुळीग, स्टेला दलभंजन, आशा थोरात यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. इतिहास संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि समाजसेवा यांचा संगम साधणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# बीजप्रक्रिया व उगवण क्षमता चाचणी करण्याचे आवाहन



आरंभ मराठी । उमरगा

चालू खरिपात 'अल निनो'च्या प्रभावामुळे पावसाचा खंड पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या बदलत्या हवामानाचा सामना करण्यासाठी आणि शाश्वत उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी यंदा बीबीएफ (रुंद वरंबा सरी) आणि टोकन पद्धतीनेच पेरणी करावी, असे आवाहन तालुका कृषी विभागामार्फत करण्यात आले.

खरीप हंगाम 2026 च्या अनुषंगाने उमरगा तालुक्यातील गावांमध्ये बीज प्रक्रिया, उगवण क्षमता चाचणी, बीबीएफ द्वारे पेरणी विषयी जनजागृती मोहिमेचे नियोजन तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आलेले आहे.उमरगा तालुक्यातील कोळेवाडी येथे आयोजीत खरिपाच्या हंगामपूर्व बैठकीत सहाय्यक कृषी अधिकारी सचिन पवार यांनी शेतकऱ्यांना हे मार्गदर्शन केले. या बैठकीमध्ये सचिन पवार यांनी पेरणीपूर्वी बियाणांची उगवण क्षमता चाचणी आणि बीजप्रक्रिया करण्याचे महत्त्व प्रात्यक्षिकांसह समजावून सांगितले.

# धाराशिव लेणीच्या संवर्धनासाठी पुढाकार घेण्याची पर्यटन विकास समितीची तहसीलदारांकडे मागणी

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्याचा ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या महत्त्वपूर्ण वास्तूंमध्ये धाराशिव लेणीचा समावेश असून या ऐतिहासिक ठेव्याचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी पर्यटन जनजागृती संस्था, धाराशिव संचलित पर्यटन विकास समितीच्या वतीने नायब तहसीलदार महादेव शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शिवराज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त दि. ६ जून २०२६ रोजी धाराशिव सेवक फाउंडेशन व आस्था स्कूल ऑफ नर्सिंग यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव लेणी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी परिसरातील कचरा हटवून फुलझाडांची



लागवड करण्यात आली. स्वच्छता मोहिमेदरम्यान लेणीतील अनेक भिंती विद्रूप झाल्याचे निदर्शनास आले. काही अज्ञात व्यक्तींनी भिंतींवर नावे कोरल्यामुळे प्राचीन शिल्पकलेचे नुकसान होत असल्याचे आढळून आले. तसेच परिसरात चिप्सची पाकिटे, दारूच्या बाटल्या, पाण्याच्या बाटल्या, कंडोम आणि विविध प्लास्टिक कचरा मोठ्या प्रमाणात विखुरलेला असल्याचे दिसून आले. हा सर्व कचरा एकत्र करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. पर्यटन विकास समितीने लेणीच्या संरक्षणासाठी कायमस्वरूपी दोन सुरक्षा रक्षक नियुक्त करणे, नियमित स्वच्छतेसाठी सफाई कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे तसेच पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. यावेळी पर्यटन विकास समितीचे उपाध्यक्ष गणेश वाघमारे, कोषाध्यक्ष बाबासाहेब गुळीग, राजेंद्र धावरे, रविनंद ओव्हाळ यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते.

दैनिक आरंभ मराठी

## शेतकरी संघर्ष समितीची मागणी

# अटी, शर्ती वगळून शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी द्या

आरंभ मराठी । नळदुर्ग

शेतकऱ्यांना कर्जमाफी देताना ज्या जाचक अटी टाकण्यात आले आहेत ते शिथिल करून सरसकट कर्जमाफी देण्यात यावी अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने अप्पर तहसील कार्यालय नळदुर्ग व पोलीस ठाणे नळदुर्ग यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनात असे म्हटले आहे की महाराष्ट्र सरकारने मार्च 2026 च्या विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयापर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपये प्रोत्साहन लाभ देण्याची घोषणाही करण्यात आली होती. महाराष्ट्र शासन सरकारच्या वतीने या कर्जमाफी योजनेसाठी शासन आदेश 2 जून 2026 रोजी काढलेला असून त्या आदेशातील जाचक अटी व शर्तीमुळे अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहणार आहेत तसेच धाराशिव जिल्ह्यातील पिक विमा शेतकऱ्यांना मिळालेला नाही गलीप हंगाम 2024-25 व 2025-26 हंगाम उसबिल शेतकऱ्यांना मिळाले नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना



गेल्या तीन वर्षांपासून आसमानी आणि सुलतानी संकटाचा सामना करावा लागत असल्याने शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळायला पाहिजे होती परंतु जाचक अटी व शर्तीमुळे शेतकऱ्यांच्या जखमेवरती मीठ चोळण्याचे काम सरकारने केलेले असून या कर्जमाफीच्या अनुषंगाने काढलेल्या परिपत्रकातील जाचक अटी व शर्ती शिथिल करण्यात यावे तसेच संबंधित धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा उर्वरित रक्कम व शेतकऱ्यांचे थकीत उसबिल शेतकऱ्यांना तात्काळ देण्यात यावे अन्यथा शेतकऱ्यांनी वरील अन्यायाच्या विरोधात शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने तीव्र आंदोलन पुढील आठवड्यात करण्यात येणार असल्याबाबत चे निवेदन अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड व नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र गायकवाड यांना देण्यात आले. त्यावेळी शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयक दिलीप जोशी, समितीचे जिल्हाध्यक्ष सरदारसिंग ठाकूर, महादेव बिराजदार,पंडित पाटील,महेश घोडके, बाबूसिंग राजपूत,विक्रांतसिंग राजपूत, शेख इमाम मुजावर, मानसिंग ठाकूर,तोलू पटेल,श्रीकांत पोतदार, गुलाब शिंदे इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

# तुळजाभवानी मंदिरात अभिषेक पूजेसाठी भाविकांना टोळ भैरव मार्गे सोडा

## गटनेते औदुंबर कदम यांची मंदिर संस्थांनकडे निवेदनाद्वारे मागणी

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजाभवानी मंदिरात सुरू असलेल्या विकास कामांमुळे भाविकांना महाद्वार ऐवजी बिडकर पायऱ्यामार्गे प्रवेश देण्यात येत आहे. मात्र अभिषेक पूजेसाठी सुद्धा भाविकांनी बिडकर पायऱ्यामार्गेच प्रवेश देण्यात येत असून याबाबत भाविकांना अभिषेक पूजेसाठी टोळ भैरव मार्गे सोडण्याची मागणी नगर परिषदेचे गटनेते औदुंबर कदम यांनी निवेदनाद्वारे मंदिर संस्थान कडे केली आहे.

कदम यांनी निवेदनात म्हटले आहे की, देवीच्या दर्शनासाठी व कुलाचार करण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या मार्गात बदल करण्यात आला असून, सध्या अभिषेक पूजेसाठी भाविकांना बिडकर पायऱ्या मार्गे सोडण्यात



येत आहे. मात्र सदरील मार्ग हा भाविकांसाठी लांब पडत असून शुक्रवार पेठ, कमान वेस, मंकावती गल्ली, साळुंके गल्ली, भोसले गल्ली, या ठिकाणी पुजाऱ्यांची घरे मोठ्या प्रमाणात आहेत. पुजारांकडे येणाऱ्या भाविकांना हा मार्ग लांबचा पडत असून यामधील काही भाविक व वृध्द व लहान मुले असल्याने टोळ भैरव मंदिराकडून अभिषेक पूजेचा मार्ग सोपा पडत असून त्या मार्गाने सोडण्यात यावे तसेच व्हीआयपी दर्शन पास चे भाविक अभिषेक पूजा झाल्यानंतरच मंदिरात सोडण्यात येत असल्याने मंदिरात कोणत्याही प्रकारची गर्दी होणार नसल्याचे या निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे अभिषेक पूजेसाठी सर्व भाविकांना टोळहभैरव मार्गाने सोडण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंदे, गटनेते औदुंबर कदम, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, नगरसेवक लखन पेंदे, सुनील रोचकरी, दिनेश क्षिरसागर, माऊली भोसले आदी उपस्थित होते.

आरंभ मराठी